पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक ०६/०५/२०१९

आज रोजी सकाळी ८.३० ते ९.०० वाजताचे सुमारास उप विभाग हेडरी अंतर्गत पोलीस मदत केंद्र गट्टा जां. हद्दीतील जांभीया गट्टा ते आडंगे रोडवर नक्षलवादयांनी इसम नामे शिशीर मंडल, वय ४२ वर्ष, रा. बांदे ( छत्तीसगड ) ह.मु. गट्टा जां. ता. एटापल्ली जिल्हा गडचिरोली याचा आपसी वादातुन डोक्यात बंदुकीची गोळी मारुन खुन केला. मृतक हा नक्षलवादयांना नेहमी मदत करीत होता, अशी गोपनिय माहिती आहे. त्यांच्यात आर्थिक देवाण घेवाण मधुन वाद झाल्याने नक्षलवादयांनी त्याचा निर्घुणपणे खुन केला आहे. नक्षलवादयांनी सामान्य जनतेची दिशाभुल करण्यासाठी व दहशत निर्माण करण्यासाठी मृतक हा पोलीस खब-या असल्याचे म्हटले आहे.

नक्षलवादी नेहमी खोटे अपप्रचार करुन नेहमीच सामान्य जनतेची दिशाभुल करण्याकरीता सामान्य इसमांचा खुन करुन तो पोलीस खब-या असल्याची बतावणी करीत आहेत. आज पर्यंत नक्षलवादयानी पोलीस खबरी असल्याचे कारण पुढे करत ५२२ निरपराध इसमांचा निर्घुणपणे खुन केला आहे. नक्षलवादयांचा जिल्हयातील विकासाला विरोध आहे त्यामुळे नक्षलवादयांच्या या खोटया अपप्रचाराला सामान्य जनतेने बळी पडु नये. गडचिरोली पोलीस दल नेहमी सामान्य जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन जिल्हयाच्या विकासाकरीता सामान्य जनतेने गाव पातळीवर नक्षलवादंयाना गावबंदीची मोहीम आणखी तिव्र करावी. असे आवाहन पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे यांनी केले आहे.